।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष १० वे ❖ अंक ६ वा ❖ माघ - फाल्गुन शके १९३५ ❖ ३१ जानेवारी २०१४ ते ३० मार्च२०१४

**प्रकाशक व मुद्रक:**

**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर

{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}

संपर्क : ९८२०५४९४१५

Website - www.shridatt.org

**प्रकाशनस्थळ :**

**श्रीदत्त प्रकाशन,**

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,

डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,

गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**

**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**

१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**


## अंतरंग


- भक्तगाथा ०३
- रुचि रुचि भोजन ०९
- गोजिरवाणी - सौ. नीता कुलकर्णी १०
- गुंजारव १ - सौ. शुभांगी मोकाशी ११
- गुंजारव २ - मधुरा ११
- भागिरथीच्या काठावर... १२
- तरुणाई - आरती १४
- शब्द तेच छेडीता - मुग्धा १६
- षट्‌तिला एकादशी - मुक्ता १७
- बहुमूल्य भेट - हिमगौरी जोशी १८
- उत्सव विशेष १५,१९

## संपादकीय...✍

गुरुमूर्ती ही जरी सर्वसामान्यांप्रमाणे दिसत असली तरी ती निश्चितच वेगळी असते. ह्याचा प्रत्यय नुकत्याच झालेल्या श्रीसस दत्तमहाराज जयंती सोहळ्यात अनुभवास आला. 'गुरुमूर्ती चैतन्य देखियली, वरी वरी दिसे देहधारी' हे प्रत्येक जण श्रवणातून अनुभवत होता.

संस्कृत सुभाषिताप्रमाणे कावळा व कोकिळा जरी रंगाने सारखे असले तरी वसंत ऋतूत कोकिळा ही कोकिळाच असते तर कावळा कावळाच असतो. आपण गुरुदेवांना सर्व सामान्यांप्रमाणे समजतो. परंतु जसे वसंत ऋतू कोकिळेचे वेगळेपण सिद्ध करतो तसेच मंदिरातील महाराजांचे निरूपण ते ब्रह्महीरा आहेत याची जाणीव करून देतात. त्यांचे फक्त निरूपणच नाही, तर त्यांचे आचरणही तसेच असते. त्यांच्या देहबोलीतून ते निजांगे ब्रह्मच आहेत हे उमजते.

भक्तगाथेत श्रीसस बलभीम महाराज आपल्या शिष्याचा वृत्तीपालट कसा करतात हेच वर्णन आले आहे. आपल्या शिष्याच्या अंतरंगात महाराज पहिल्याच बोधात कसे शिरतात व कायम स्वरूपी राहतात हे सांगितले आहे. 'सदाचारा'तही 'देहाएवढे मी पण' हेच सर्व बंधनांचे मूळ आहे हे समजावून सांगितले आहे. हे नुसत्या शब्दांनी वर्णन न होता अंगी कसे बाणले पाहिजे हे 'गोजिरवाणी' त कळते.

महाराजांनी जरी वारंवार समजावून सांगितले तरी संभ्रम निर्माण होतो. तो आपोआप दूरही होतो, हे 'तरूणाई' वाचताना जाणवते. सभोवताली कसे बघावे ही दृष्टीच आपल्याला ते देत असतात. एकदा का असे बघायला लागलो की सगळीकडे तोच अर्थ सापडू लागतो, हे 'बहुमूल्य भेट' व 'शब्द तेच छेडिता' वाचताना जाणवते.

अशी दृष्टी महाराज आपल्याला देत असतात. खरं तर जेथे जेथे प्रकाश पडतो तेथे तेथे आपली बाह्यदृष्टी पडत असते. परंतु अंतर्गत दृष्टी ही आत्मप्रकाशाचा वेध घेणारी असावी हीच सद्‌गुरुचरणी प्रार्थना!

> आजवरचे आयुष्य वाया गेले. उरलेले तरी संभाळायला हवे. पुढला क्षण आपल्या हातात नाही. म्हणून प्राप्तघडी साधून 'आत्मप्राप्ती' करून घेऊन 'आत्मोद्धार' करून घ्या. आत्मप्राप्तीनंतर 'श्रवण मनन व चिंतना' खेरीज दुसरे काही साधन नको. 'काय करू कसे करू' हा अष्टाक्षरी मंत्र न जपता, 'हा मी नाही, तो मी आहे' हा अष्टाक्षरी मंत्र जपा.
>
> – श्रीसस भागीरथीनाथ



## भक्तगाथा...✍

श्री. नागेशराव काथवटे हे नरसिंगड येथील 'नाझीम' होते म्हणून त्यास बहुतेक सर्व लोक 'मालकसाहेब' या नावाने बोलावित. बोवा प्रथमतः ज्या वेळी नरसिंगडी आले होते त्याच वेळेस मालकसाहेबांच्या मनात बोवांविषयी आदर व प्रेम उत्पन्न झाले होते. साडेगावी जाण्यास बोवा ज्या वेळेस निघाले त्यावेळेस नरसिंगडी जरूर पुन्हा येण्याविषयी मालकांनी त्यास बराच आग्रह केला होता. मालकसाहेब, सौ. ताईसाहेब वगैरे मंडळींच्या आग्रहास्तव, साडेगांवी एक महिनाभर राहिल्यावर बोवा चि. दत्तात्रय व पत्नी कृष्णाबाई या दोघांसह पुन्हा नरसिंगडी आले. बोवांस पाहताच मालकसाहेब व त्यांच्या पत्नी सौ. मथुराबाई हे उभयतां सामोरे गेले व त्यास साष्टांग नमस्कार करून घरात आणून बसविले. कुशल प्रश्न झाल्यावर मालकसाहेबांनी बोवांस आपले घरीच राहण्याची विनंति केली. बोवांनी मालकसाहेबांस सांगितले की, 'मी गावातून भिक्षा मागेन व निराळा स्वयंपाक करून खाईन, तुम्हांला माझ्या करिता तसदी देणार नाही.' हे बोलणे काथवटे मंडळीस मुळीच रूचले नाही. कारण ज्यांस आपण पूज्य मानतो, त्यांनी आपले घरी येऊन भिक्षा मागावी हे त्यास बरे वाटेना. म्हणून नागेशरावांनी बोवांस विनंति केली की, 'महाराज, आपण भिक्षा मागू नये. काही झाले तरी आम्ही आपणांस भिक्षा मागू देणार नाही. तुम्ही सर्व मंडळींनी आमच्या घरीच भोजन करावे. म्हणजे आम्हा पामरास आपला पवित्र प्रसाद मिळत जाईल व तया योगे आमचे कल्याण होईल. करीता आमच्या हिताकडे लक्ष देऊन तरी आपण भिक्षा न मागता व काही संकोच न करिता आमच्या घरीच भोजन वगैरे सर्व व्यवहार करावेत व आम्हा सर्वांस आपली सेवा करण्याची संधी द्यावीत.' घरी जेवण्याबद्दलचा आग्रह आहे असे पाहून बोवांचा नाईलाज झाला. शेवटी त्यांनी अशी तोड काढली की, काथवटे यांजकडून शिधा मागून घेऊन निराळा स्वयंपाक करावयाचा. काथवटे यांनी ही गोष्ट मोठ्या कष्टाने कबूल केली व त्याप्रमाणे प्रथम काही दिवस ते शिधा मागून घेऊन निराळा स्वंयपाक करीत होते. पुढे काथवटे मंडळींशी जसा जसा स्नेह संबंध वाढत गेला तसा तसा निराळा स्वयंपाक करण्याचा बोंवाचा हट्ट कमी कमी होत

गेला व एके दिवशी नागेशरावांच्या आग्रहास्तव निराळा स्वयंपाक करण्याचा हट्ट त्यांस सोडून द्यावा लागला व त्यांनी मालकसाहेबांच्या घरीच जेवण्याचे कबूल केले.

श्री. नागेशराव काथवटे हे नरसिंगड संस्थानात ज्युडिशिअल मेंबर होते. त्यांच्या सदाचरणामुळे ते तेथे लोकमान्य होते. त्यांची राहणी अत्यंत साधी व वर्तन चोख होते. त्यांचे अंतःकरण फार कोमल व सत्त्वशील होते. नागेशरावांस नरसिंगडी सर्व लोक मोठा मान देत असत. पण त्यांस आपल्या हुद्याचा जराही अभिमान नव्हता. त्यांच्या पत्नी सौ. मथुराबाई उर्फ ताईसाहेब व आईसाहेब (सौ. मथुराबाईंची जननी) या पंढरपुरास काही दिवस सत्संगतीत होत्या, म्हणून त्यांस पारमार्थिक परिभाषेचे व सांप्रदायाचे थोडे तरी वारे लागलेले होते. त्यांस बोवांची वर्तणूक व स्थिती पाहून त्यांजविषयी फारच आदर वाटे. नरसिंगडी आल्यावर बोवांनी पुराणाचा व कथेचा क्रम सुरू ठेविलाा व फावल्यावेळी वेदांत चर्चाही करीत असत.

याप्रमाणे काही दिवस गेल्यावर सौ. मथुराबाई उर्फ ताईसाहेब व त्यांची आई यांस अनुग्रह घ्यावा असे वाटून त्यांनी एके दिवशी बोवांपासून अनुग्रह घेतला व त्यामुळे त्यास परमानंद झाला. आपण ज्याप्रमाणे बोवांचे अनुग्रहीत झालो व आनंद पावलो त्याप्रमाणे मालकसाहेबांनीही व्हावे असे त्या दोघीस वाटे. मालक साहेब प्रथम अनुग्रह घेण्यास तयार नव्हते. बोवांची कीर्तने व संभाषणे रोज ऐकून ऐकून त्यांचीही मनोवृत्ति अधिकाधिक कोमल व परिणामशील होऊ लागली.

नागेशराव मूळ द्वैत सांप्रदायी वैष्णव असल्या कारणाने त्यास असे वाटे कीं, बोवा अद्वैत मताचे असल्याने त्यांचे अनुयायी आपण झाल्यास आपला वैष्णवी सांप्रदाय लुप्त होईल व आपल्या पूजा ध्यानादिकांवर पाणी पडेल, म्हणून ते अनुग्रह घेण्यास प्रथम कबूल नव्हते. मालकसाहेबांच्या मनातील ही शंका जरी त्यांनी कोणाजवळ बोलून दाखविली नव्हती तरी बोवांनी मालकसाहेबांच्या मनातील चाललेला गोंधळ तेंव्हाच ओळखला. ''कळवळ्याची जाती। करी लाभावीण प्रीती।। बाळकाचे हित। जाणे माऊलीचे चित्त।।'' या उक्तीप्रमाणे, बालक संकटांत आहे, चिंतामग्न होऊन गटांगळ्या खात आहे, संकोचामुळे बोलत नाही, पण आतून अंतःकरण निर्मळ व शुद्ध आहे, असे दिवसेंदिवस बोवांच्या प्रत्ययास मालकांविषयी येऊ लागले. शेवटी बोवांनी



आपण होऊनच एके दिवशी मालकसाहेबांजवळ गोष्ट काढली व ते प्रेमाने त्यास म्हणाले की, ''मालक मी माझे रहस्य तुमचे घरातील बायकामंडळीस सांगत असतो व ते त्यास पटते, परंतु आता आपणांस ते सांगावे असे मला वाटत आहे. बायकामंडळी भोळ्या व भाविक असल्याने त्यास ते लवकर पटते, पण आपणासारख्या बुद्धिमानास जर परमात्मकृपेने यथाशक्ति मी आपले म्हणणे पटवू शकलो तर मला फार आनंद होईल. माझ्या समजुती खेडवळ व अल्प असल्या तरी त्या चुकीच्या आहेत असे मात्र खास ठरले जाणार नाही. आपणास जे माझे भाषण पटेल तेच आपण ग्राह्य करावे, जे न पटेल ते करू नये. कोणत्याही बाबतीत माझा दुराग्रह नाही. मालक मी अद्वैतमताचा पुरस्कर्ता आहे खरा! अद्वैत सांप्रदाय हा आद्य श्री शंकराचार्यांपासून विशेष प्रसृत झाला. हा सांप्रदाय अत्यंत व्यापक असून या सांप्रदायाचे दुसऱ्या कोणत्याही सांप्रदायाशी वैर अथवा मात्सर्य नाही. आमचा भागवद्धर्म अद्वैतमताशी एकरूप आहे; तो इतर सर्व सांप्रदाय, पंथ व मते यास पोटात घेऊन खरे उच्च ध्येय दाखवितो. याची पूर्ण सत्यता आपणास अनुग्रह व आत्मबोध झाल्यानंतर पटली तरच माझे म्हणणे सत्य माना; नाही तर मानू नका. भागवद्धर्मात द्वैताद्वैताचा झगडा नसून त्याचा सुंदर मिलाफ आहे. ज्यास भागवद्धर्माचे अथवा भागवत्सांप्रदायाचे खरे खरे रहस्य कळले आहे, त्यास वरवर दिसणारे भेद नाहीसे होऊन, अंतरी असलेली एकवाक्यता दिसत असते. मालक भागवद्धर्म हा सागराप्रमाणे असून इतर पंथ अथवा सांपद्राय व मते ही नद्यांप्रमाणे होत. त्या सर्वांचे मीलन व पर्यवसान या भागवद्धर्म सिंधूतच होते. आपण एकवार भागवद्धर्माचे मनःपूर्वक परिशीलन करा व त्याचे स्वरूप जाणून त्याचा अनुभव घ्या आणि तुम्हास जर तो धर्म इतर सांप्रदायांशी, पंथांशी अथवा मतांशी विरोधी आहे असे आढळून आले तर मग आपण मला खुशाल दोष द्या. भागवद्धर्मांत सर्वांची एकवाक्यता कशी आहे हे मी आपणास सप्रमाण सिद्ध करून देईन. आपणांस जर ते अनुभवाने पटले तर आपण कबूल करावे, नाहीतर कबूल करू नये. भागवद्धर्म हा केवळ अंधश्रद्धेवर उभारलेला नसून, त्याचा पाया न्यायशास्त्र, तर्कशास्त्र व अनुभव यावर उभारलेला आहे. तो एकांगी म्हणजे काही विशिष्ट वर्गासच लागू व इतरास नव्हे असाही नसून अत्यंत व्यापक व उदार आहे. त्याची महति मी आपल्या मुखाने वर्णन

करण्यास असमर्थ आहे. ''पानी पीना छानके। और गुरु करना जानके।'' या हिंदी म्हणीप्रमाणे आपण प्रत्येक वस्तूची परीक्षा करून ती घ्यावी. मी जे सांगतो अथवा सांगेन ते श्रुति, स्मृति, शास्त्र, पुराण आणि अनुभव यास संमत असेल तर ते घ्यावे, नसेल तर ते टाकावे. मालक मी आपणांस जे दोन शब्द सांगणार आहे ते माझ्या स्वतःच्या पदरचे नसून परंपरागत आहेत. जे श्रीकृष्णाने अर्जुनास व शिवाने पार्वतीस सांगितले तेच श्रीगुरुकृपेने मी आपणास सांगणार आहे. यात माझे असे काही नाही. म्हणून मला खात्री आहे की, माझे वेडेवाकडे गांवढळ पद्धतीचे बोल आपण निदान ऐकून घ्याल व त्याचे मनन कराल. आपण विद्वान व सूज्ञ असल्याने जास्त सांगणे नकोच.''

याप्रमाणे बलभीमबोवांचे प्रेमळ व हृदयस्पर्शी वचन ऐकल्यावर, मालकांच्या मनात चाललेला गोंधळ थांबला व शंका दूर झाली. परंतु बोवांचा अनुग्रह घ्यावा किंवा नाही याचा एक निश्चय होईना. बोवांची शुद्ध प्रेमळ 'कुसुमादपिमृदूनि' वचने ऐकून आतून तर असे वाटे की, ताबडतोब अनुग्रह घ्यावा. थोडा वेळ विचार केल्यानंतर आपल्या सासूबाई व पत्नी मथुराबाई उर्फ ताईसाहेब यांची संमति घेऊन दुसरे दिवशी मालकसाहेबांनी बोवांचा अनुग्रह घेण्याचे ठरविले.

दुसरे दिवशी प्रातःकाली नित्य नेम संध्या, पूजा, गीतापाठ वगैरे उरकून मालकांनी श्रीबलभीमबोवांचे यथाविधि मोठ्या प्रेमाने पूजन केले. गंध, पुष्प, धूप, दीप, आरती वगैरे झाल्यावर मालकांस बोवांनी आपले सन्निध घेऊन स्वतःचे सांप्रदायास अनुसरून त्यास अनुग्रह देऊन आत्मबोध केला. मालक विद्वान व शुद्ध अंतःकरणाचे असल्यामुळे गुरुमहाराजांचा प्रत्येक शब्द त्यांच्या अंतःपटलावर खोदला गेला. त्यावेळचा अनुभव मालकसाहेब स्वतः लिहितात की, ''श्रीगुरुंनी कृपा करून माझ्या कर्णविवरद्वारा हृदयात प्रवेश ज्या दिवशी केला, त्या दिवसापासून आजतागाईत क्षणक्षण अधिकाधिक प्रेमरसाच्या उचंबळ्या हृदयाकाशांत येत आहेत. श्रीगुरुमहाराज प्रत्यक्ष देहरूपाने आज जरी इंद्रियगोचर नाहीत तरी त्यांनी हृदयात साठविलेल्या प्रेमरसाच्या रूपाने अंतरात अखंड त्यांचेच अस्तित्व आहे. हा जड देहही त्यांचेच प्रेरणेने प्रेरित आहे. त्यात माझे काहीच उरलेले नाही. श्रीगुरुमहाराज मजजवळ ज्या क्षणास अनुग्रह



देण्यास आले त्या क्षणापासून मला असे वाटे की, माझ्या चलनवलनादिक सर्व क्रिया मी करीत नसून श्रीगुरुच करवीत आहेत. फार काय सांगावे! माझा देह श्रीगुरुंच्या प्रेमसागरात तरंग रूपाने हेलकावे खात आहे. श्रीगुरुंनी कर्णात सांगितलेला मंत्र हा मंत्र नव्हे तर प्रत्यक्ष मंत्रदेवताच माझ्या कर्णातून हृदयात शिरल्या व त्यांनी तेथेच कायमचे ठाणे दिले.''

लहान मुलास ज्याप्रमाणे त्याचे वडील त्याचा हात धरून 'श्रीगणेशा' शिकवितात व त्याने अक्षर काढिले म्हणजे त्यास म्हणतात की, 'वाहवा! तू किती सुरेख अक्षर काढतोस, माझे लहानपणी मला सुद्धा असे अक्षर काढता येत नव्हते.' असे ऐकून मुलाला जसा आनंद होतो तसाच मालकसाहेब यास बोवांच्या प्रोत्साहक व प्रेमळ शब्दामुळे आनंद होत असे. बोवांपासून अनुग्रह घेतल्यानंतर मालकसाहेबांस अभूतपूर्व आनंद प्राप्त झाला व त्यांनी कृतज्ञतापूर्वक बोवांस नमस्कार करून त्यांच्या पायास घट्ट मिठी मारून नेत्रांतून प्रेमाश्रूने त्यांच्या चरणावर अभिषेक केला. मालकसाहेबांच्या मस्तकावर हात ठेवून नंतर त्यांस उठवून बोवांनी आपले जवळ बसविले. बोवांनी त्यास हळूच विचारले 'मालक अद्वैत सांप्रदायाचा आपणास अनुभव आला ना? तो भजन, पूजन, ध्यान वगैरे गोष्टींच्या विरूद्ध आहे काय?' मालकांनी उत्तर दिले की, 'महाराज, आपल्या कृपेने आता असा अनुभव येत आहे की, ज्याप्रमाणे पाण्यावर पाणी तरंग रूपाने खेळले तरी पाण्याची एकरूपता नष्ट होत नाही, तद्वत् परमात्म्याचे पूजन, ध्यान अथवा भजन केल्याने अद्वैत परमात्मरूप जसेच्या तसेच असते. त्यात यत्किंचितही बिघाड न होता द्वैताचा विलास आनंदाने सहज घडतो.' हे उत्तर ऐकताच बोवांस फार आनंद झाला व त्यांनी मालकसाहेबांची पाठ थोपटून त्यास गाढ आलिंगन दिले. मालकसाहेबांचे प्रेम बोवांच्या चरणी दिवसेंदिवस वाढत चालले व बोवांसही मालकांच्या एकनिष्ठतेबद्दल व परमार्थ प्रवीणतेबद्दल कौतुक वाटू लागले. मालकांची परमार्थमार्गात थोडक्या कालातच बरीच प्रगती झालेली पाहून स्वतः बोवासही आश्चर्य वाटे. गुरुशिष्यांचे परस्पर प्रेम फार असे. त्यांची परस्पर वागण्याची पद्धत पाहून इतर सर्व मंडळीस समाधान वाटे.

नरसिंगडी बोवांनी भजन, पूजन, कीर्तन वगैरे नित्य नेमाचा क्रम चालू ठेविला

होता. भजनास व कीर्तनास बऱ्याच मंडळींचा जमाव होत असे, बोवांच्या कीर्तनास तर फार बहारीचा रंग येई. बोवा कीर्तनास उभे राहून आरंभी पंचपदी वगैरे म्हणू लागले म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर विलक्षण दैवी तेज चमकत असे. परमात्म्याशी त्यांचे तादात्म्य झाल्यामुळे त्यांच्या मुखातून जी जी वाक्ये निघत ती ती अतिशय परिणामकारक व स्फुरणदायक होत असत. त्यांच्या कीर्तनास आलेला आबालवृद्ध श्रोतावृंद आनंदाने डोलत असे. ज्याप्रमाणे तुपात तळून काढण्याकरीता सोडलेली पुरी फुगून बाहेर येते त्याप्रमाणे श्रोतृगणांच्या वृत्त्या कीर्तन संपल्यावर निजानंदाने तृप्त झालेल्या टवटवीत दिसत. त्यांची कीर्तन करण्याची शैली फारच अपूर्व असे. आपल्याप्रमाणे आपल्या शिष्यांपैकी प्रत्येक जणाने कीर्तन करावे अशी त्यांची फार मनापासून इच्छा असे व त्याप्रमाणे ते काही काही शिष्यांस कीर्तन करण्यास अवश्य उभे करीत व कीर्तन कसे करावे हे शिकवीत असत. बोवांनी आपल्या शिष्यिणींनाही कीर्तन करावयास लावले. त्यांना मूळ अभंग काढून देऊन, प्रमाणांची संगति सांगून कीर्तन शिकवीत असत. येवढेच नव्हे तर स्वतः मागे उभे राहून सर्व दृष्टीने कथा उत्तम प्रतीची वठविण्यास खटपट करीत असत. कथा झाली म्हणजे सर्वांच्या आधी आपण स्वतः कीर्तन करणारास शाबासकी देऊन त्यास पूर्ण उत्तेजन देत व मनापासून त्याचे कौतुक करीत.

एके दिवशी बोवांनी मालकसाहेब यास कीर्तन करावयास सांगितले. कथा कशी करावी हे अगदीच माहित नसल्याने प्रथमतः ही गोष्ट त्यांनी नाकारली. बोवांच्या मनात मालकसाहेबांनी दर गुरुवारी व दर एकादशीस कथा करावी व प्रभूचे गुणानुवाद गावे असे फार होते. म्हणून ते मालकसाहेबांस म्हणाले ‘मालक कथा कीर्तन, भजन, पूजन वगैरे दुसऱ्यासाठी नसून स्वतः करीता आहे. कथेत अथवा भजनात प्रभूच्या लीला प्रभुप्रित्यर्थच गावयाच्या व सांगावयाच्या असतात. त्या आपण निरहंकार बुद्धीने व भक्तीने गाईल्या म्हणजे परमात्मा संतुष्ट होतो. करीता मालक तुम्ही अनुमान न करता निर्लज्ज होऊन कीर्तन करण्यास उभे राहावे. प्रथमतः आपणास साह्य करण्याकरिता आपले पाठीमागे साथ देण्यास मी उभा राहीन. आपण काळजी करू नये. चांगल्या गोष्टीचा उपक्रम धीराने करून तो नेटाने व साक्षेपाने चालू ठेवावा.’



बोवांचे हे आग्रहपूर्वक बोलणे ऐकून नाइलाजास्तव कथा करण्यास मालक उभे राहिले व तेव्हापासून दर एकादशीस व दर गुरुवारी कीर्तन करण्याचा नियम चालू ठेवला.

याच सुमारास रा. गोविंदराव वैद्य इंजिनिअर व त्यांच्या पत्नी भागिरथीबाई ऊर्फ ठकुताई या उभयतांनी बोवांचा अनुग्रह घेतला. बोवांनी उभयतांस कथा करावयास शिकविले. श्री. गोंविदराव व ठकुताई या उभयतांची बोवांवर अत्यंत निष्ठा असे. त्यांनी बोवांची सेवा अखेरपर्यंत उत्तम प्रकारे केली. ठकुताई नियमाने दर गुरुवारी व दर एकादशीस हरिकीर्तन करीत असत. ठकुताई बुद्धिमान असल्यामुळे लिहिणे, वाचणे जरी बेताचेच होते तरी कथा करण्याची हातोटी त्यास फार लवकरच साधली. ठकुताईच्या ठिकाणी असलेली बुद्धी व गुरुश्रद्धा पाहून बोवांस त्यांचे फार कौतुक वाटे. श्री. गोविंदराव हे कीर्तन फार चांगले करीत असत. बलभीमाबोवांवर त्याचे निःस्सीम प्रेम होते. बोवांची कथा ऐकावयास बसले म्हणजे गोविंदरावास प्रेमाश्रु येऊन कंठ दाटून येत असे. अनुग्रह घेतल्यानंतर त्यांचे लक्ष दिवसेंदिवस परमार्थाकडे विशेष जडत गेले. त्यास पोटदुखीचा विकार होता. ते सवंत् १९७८ मध्ये म्हणजे सन १९२२ मध्ये मु।। देवास येथे वारले. याप्रमाणे नरसिंगडास काथवटे यांचे घराणे, वैद्य यांचे घराणे, तांबे यांचे घराणे वगैरे पुष्कळ घराणी परमार्थमार्गास लावून काही दिवस तेथे मुक्काम करून नंतर बोवा परत साडेगांवी आले.

■■■

## रुचि रुचि भोजन

या नारळाचे तीन भाग काढून शुद्ध सत्त्व खोबरे घातले।
हळूहळू केले वडीला।।धृ.।।
ज्ञानाग्नीची आंच मंदाग्नी लाविली। तेणे मिष्टता आली वडीलाही।।१।।
प्रेमाची साखर तयात घातली। विवेके घोटीली तयालाही।।२।।
स्वात्मानुभव वेलची घातल्याने। साची सुंदर झाली ही।।३।।
गुरुनाथे थापटुनी थापटुनी। तयार केली वडीला।।४।।
माधुरीदत्त साधक सेवित। होती तृप्त वाहवा म्हणत।।५।।

## गोजिरवाणी...✍

- सौ. नीता कुलकर्णी

**आजी** - आज मी तुम्हाला तुकाराम महाराजांची गोष्ट सांगणार आहे.

**मुले** - सांग ना, आजी!

**आजी** - तुकाराम महाराजांची कीर्ती शिवाजी महाराजांच्या कानावर गेली. खरं तर त्यांना तुकाराम महाराजांना भेटायचे होते. परंतु वेळेअभावी त्यांनी पंडितराव या सरदाराकडून तुकाराम महाराजांना नजराणा पाठवला.

**मुले** - हो आजी?

**आजी** - हो! त्यांनी मोत्याचा कंठा, शाल, मोहरा सगळे पाठवले. पंडितराव देहू गावात सैन्य घेऊन वाजत गाजत आले. घोडे तुकाराम महाराजांच्या वाड्यापाशी आले. मंबाजी तुकाराम महाराजांचा द्वेष करायचा. त्याला वाटले शिवाजी महाराजांनी तुकाराम महाराजांना पकडायला सैन्य पाठवले.

**मुले** - मग पुढे काय झाले?

**आजी** - तुकारामांच्या घरी पंडीतराव आले. तुकाराम महाराज देवळात गेले होते. निरोप कळल्यावर ते एकतारी वाजवत आले. सैन्य पाहिल्यावर त्यांना समजेना! पंडितरावांनी पुढे येऊन मुजरा केला व नजराणा बहाल केला.

**मुले** - मग त्यांना आनंद झाला का?

**आजी** - त्यांनी शिवाजी महाराजांचे पत्र वाचले पण नजराण्यावर तुळशीचे पान ठेवले. ते म्हणाले, **'सोने आणि माती। आम्हा समान हे चित्ती।। तुका म्हणे आले घरी वैकुंठ सगळे।।'**

**मुले** - पुढे ते काय म्हणाले?

**आजी** - ते म्हणाजे,'शिवाजी महाराजांना सांगा, तुम्ही आहात म्हणून देहूगावावर परकीय आक्रमण झाले नाही. हाच तुम्ही आम्हाला मोलाचा नजराणा दिलेला आहे. बाकी आम्हाला काय कमी आहे?'



**मुले** - हो आजी?

**आजी** - बरं का मुलांनो, एका विठ्ठलाशिवाय त्यांना कशातच रस नव्हता. त्यांच्या निर्मोहीपणाची खात्री तिथे असलेल्या सर्वांनाच पटली.

**मुले** - खरचं आजी नुसते बोलणे वेगळे, प्रत्यक्ष कृतीतून दाखवणे हेच खरे!

---

## गुंजारव - १

- सौ. शुभांगी मोकाशी

सद्‌गुरु खरे गणगोत। जाणुनी होऊ त्यांचे आप्त।  
अलौकिक प्रेम त्यांचे। साथी तोचि सदोदीत।  
करोनी घेई प्रीती। सर्वेंद्रिया पाजूनी अमृत।  
जन्मोजन्मीचे मायबाप ते। बालक आम्ही अनंत।  
पाठी थोपटूनी मुखी। ज्ञानघास भरवत।  
अनुभवू जाणू प्रेम। त्यांचे चराचरात।  
क्षणोक्षणी सय त्यांची। भरती नेत्र काठोकाठ।  
घेती हरवूनी त्यांच्यात। आपल्याही नकळत।  
अखंड शुभांगी माधुरी। गुणगान गात गात।  
भान विसरूनी म्हणू। माधुरीदत्त माधुरीदत्त।

## गुंजारव - २

- मधुरा

हा डोंगर उंच कसा म्हणू? पायथ्याशीच माथा गवसतो!  
हे क्षितिज तिथे दूर कसे म्हणू? एका उःश्वासात गाठता येते!  
हा समुद्र विशाल कसा म्हणू? हात पसरताच ओंजळीत सामावतो!  
हे आकाश असीम कसं म्हणू? बाहू पसरताच कवेत येतं!  
ही वाट कशी लांब म्हणू? वाट गवसताच गाव सापडतं!  
मधुराचं मन कसं नाठाळ म्हणू? गुरुदेवांचं नाव घेताच मौनावतं!

# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार...✍

## सदाचार

२८) अन्य पाषांडी दुर्बळ। ज्ञानवार्तेचा त्या सुकाळ।
एक वेदांतविज्ञान केवळ। स्वानुभूतीनें विराजे।।२८।।

**अर्थ -** इतर पाषांडी हे दुर्बळ असतात. तेथे ज्ञानाचा अभाव असतो. फक्त एक वेदांतच आहे जे आत्मानुभूतीने शोभून दिसते.

**भावार्थ -** मागील श्लोकात सर्व शास्त्रे आत्मज्ञान जाणण्यास कशी तोकडी पडतात याचे वर्णन आले आहे. तोच भाग इथे सुरुवातीस सांगितला आहे. पाषांडी म्हणजेच जे थोतांडाच्या मागे लागतात ते दुर्बळ ठरतात. कारण तेथे आत्मज्ञान नाहीच. फक्त वेदांतच असे विज्ञान आहे की जे अनुभवता येते. तेथे आत्म्याची अनुभूती येत असल्याने ते सबळ ठरते म्हणून श्रेष्ठ आहे.

२९) मी माझें हे बंधन। मुक्ति तेचि ययावाचून।
बंधमोक्षा गुण कारण। गुण तरी प्रकृतीचे।।२९।।

**अर्थ -** मी देह मानल्याने त्यामुळे येणारे माझे माझे हेच बंधन होय. यापासूनच मुक्ति साधायची आहे. म्हणजेच 'देहाएवढे मी पण' याचा त्याग करायचा आहे. बंध आणि मोक्ष हेही गुणांमुळेच निर्माण होतात व गुण हे प्रकृतीचे आहेत.

**भावार्थ -** 'मी देह' हे मानल्यामुळे ममता उत्पन्न होते व माझे माझे असे बंधन निर्माण होते. या बंधनातूनच मुक्त व्हायचे आहे. येथे मुक्त होणे म्हणजे देहाचा त्याग करणे असे नसून 'मी देह' ही कल्पना खोटी जाणायची आहे. 'देहाएवढे मी पण' हेच सर्व बंधनांचे मूळ आहे. या खोट्या जाणीवेतून मुक्त व्हावयाचे आहे. बंध व मोक्ष हे दोन्ही 'देह मी' या जाणीवेवरच आधारलेले आहे. देह खरा मानल्यावरच त्यास बंधन येते व मुक्तीही मिळते. रज-तम गुणामुळे बद्धता येते तर मोक्षास सत्वगुण कारण ठरतो. म्हणजे हे तिन्ही गुण बंध-मोक्षास कारण आहेत. हे गुण प्रकृतीचे म्हणजेच देहाचे आहेत.



३०) अवस्था तिहीं ऐकले ज्ञान। निर्मळ निजस्वरूप पूर्ण ।
केवळ सदा समान मंदभाग्य न जाणती।।३०।।

**अर्थ -** 'सत्यम्, ज्ञानम्, अनंतम' असे जे परब्रह्मवाचक ज्ञान आहे ते तिन्ही अवस्थेत म्हणजेच जागृती, स्वप्न, सुषुप्तीत आहे. ते आपले स्वरूप आहे व ते पूर्ण असून नेहमीच आहे, समान आहे. परंतु मंदभाग्यांना हे जाणता येत नाही.

**भावार्थ -** देहाच्या तिन्ही अवस्था (स्वरूपरूप) 'मी' जाणतो. जागृतीतही 'मी' आहे. स्वप्नातही 'मी' असतो, तसेच सुषुप्तीतील अज्ञान 'मी' जाणतो. या तिन्ही अवस्थेत एका ज्ञानाशिवाय काही नाही. हेच आपले स्वरूप म्हणजे निजस्वरूप निर्मळ आहे. म्हणजेच उपाधीचा मळ तेथे लागलेला नाही. तसेच ते पूर्ण आहे. म्हणजे तेथे वाढ किंवा घट नाही. ते सदा म्हणजे नेहमी व समान म्हणजेच सगळीकडे सारखे आहे. मंदभाग्यांना मात्र हे जाणता येत नाही. कारण अंधारात दोरीच्या जागी जसा साप खरा वाटतो तसे मंदभाग्यांना नामरूपच खरे वाटते.

३१) संकल्पसाक्षी जे ज्ञान। हेचि सर्व लोकांचे जीवन।
तेचि मी जया बाणे खूण। निःसंशयी मुक्त तो।।३१।।

**अर्थ -** स्वरूपातून उठणारी स्फूर्णा म्हणजेच हरिसंकल्प! त्यावरच लोकांचे जीवन चालत असते. ही स्फूर्णा ज्या स्वरूपातून उठली ते स्वरूपच 'मी' आहे ही खूण ज्याने बाणवली तो निःसंशय मुक्त आहे.

**भावार्थ -** प्रत्येक देहामध्ये तो देह कार्यरत होण्यासाठी मन-बुध्दयादिकांच्या नकळत एक विचार उठत असतो. त्याप्रमाणे प्रत्येक सजीव देह कार्यरत असतो. आपल्या देहातला हा संकल्प नक्की कोठून उठत आहे हे जाणणारा, आपला देह चालविणारा संकल्प जाणणारे मूळ निजस्वरूप सर्व लोकांचे जीवन आहे ही खूण ज्याला निःसंशय बाणते तोच खात्रीलायक मुक्त आहे.

■■■

# तरुणाई...✍

- **आरती**

## अचानक सापडला, श्री हरीऽऽ

ज्ञानमार्गीचे कापडी होती... यह मूळपद था। हर उत्सव मे मूळपद इतने अर्थपूर्ण होते है की सिर्फ गुरुदेवने छुने की जरूरत होती है, सब अमृतमय हो जाता है। देहातित, विदेही, अध्यात्म यह बहुत बडे बडे शब्द लगते है, पर सच में अगर सिरिअसली सिरिअस हो जाए तो सिर्फ लकिर पार करने की देर है, सब सार्थक हो जाएगा। पर यह मायाबाई मन आदि को इन सबसे निकलने ही नही देती। लेकिन फिर भी उत्सव के बाद एक अंदरसे आवाज आती है, 'भाग मिल्खा भाग'। पर वह भी कुछ दिनों तक होता है, क्योंकि फिरसे माया हमे भगा ले जाती है। लेकिन सहीमें गौर करे तो चीजे सच में ही बहुत निरर्थक है। पंचभूतो और त्रिगुणों से बना शरीर है, प्रारब्ध विधिलिखित है, मतलब अगर कल मैं कोई दुकान शुरु करू, तो धंदा होना, ये प्रारब्ध है। मेरा सिर्फ मिथ्या अहंकार होता है। एक जीव का दायरा बहुत छोटासा है। वह सिर्फ इच्छा कर सकता है और उसे पुरा करने के लिए बार-बार जनम लेता है। नौ महिने का गर्भवास, फिर दैनंदिन जीवन की परेशानिया और फिर बुढापा! इससे अच्छा तो अभ्यास करके इसी जनम में मुक्त हो जाए।

पर संसार झूठ है यह हम सच में समझ नहीं पाते (भले कितनाभी बोले)। इसलिए मैं अकर्ता, अभोक्ता हूँ यह अनुभवही नही आ पाता और अहंकार की वजह से अर्पण भक्ति भी नही हो पाती।

लेकिन सच में सोचे तो पता चलता हैं कि यार मैं कुछ कर ही नही सकता। बहुत सिधा हिसाब है अगर हमारे बालभी झडने लग जाए, तो भी हम कुछ नही कर पाते। देह तो निमित्त मात्र है। पर यह पाँच-साडे पाँच फिट की देह आसक्तीही हमें माया के परे नही जाने देती। लेकिन गुरुदेव भी ऐसेही नही छोडते, वो हमे हर समय व्यापकत्व दिखाते ही है। जिससे, जीवको अपने संकुचिततापर शरम आने लग जाती है।

अभी की बात है, आरती को एक ऑफिस लेना था। सभी ऑफीसेस काफी आउट ऑफ बजेट थे। एक ऑफिस बजेटमें था। पर वह दक्षिणमुखी था, जो की



अच्छा नही माना जाता (सामान्य विचार धारासे)। देहबुद्धी आरती को भी लगी, 'यार मेरा ऑफिस दक्षिणमुखी (मेरा अहंकार)?' लता मौसी को फोन किया, पुरी स्टोरी बताई। गुरुदेवने कहा, 'मैं देखती हूँ क्या होता, ले तू वही ऑफिस ले, अपने लिए सभी दिशाएँ एक जैसी है।'

फिर जो मजेदार चीज हुअी, एकदम मस्त! ओनर से बात करने आरती गई तो उनका नाम 'आनंद जाधव'! बाहर आकर ऐसी ही उपर देखा तो बिल्डिंग का नाम 'आनंद हाईटस्', सामने एक एटीएम था, वहा से कॅश विथड्रॉ किया तो मेसेज आया,'Rs. 1500 has been withdrwan from ATM of Anand Park,' मतलब एरिआ का नाम 'आनंद पार्क' और दुसरे दिन पहली डिलींग जिनके साथ हुअी उनका नाम था 'आनंद राठी'। वहीं पर हाथ जोडे और कहाँ, 'महाराज गलती हो गयी।' और दो मिनिट के लिए लगा की उडकर गुरुदेव के पास जाऊँ, लेकिन फिर एकदम से लगा, कहाँ, कही जाने की जरूरत है? 'खाली सलाम दुआ मुलाकातोमें, चेहरे की रंगत बदल रही है, तेरी सोहबतमें।'

---

# उत्सव विशेष...

**श्री गणेश जयंती उत्सव**

**माघ शु. २ ते माघ शु. ४ दि.१ फेब्रु., ते ३ फेब्रु., २०१४**

**मूळपद**

गज शब्द उलटवा। जग शब्द होतो। तत्पद सुचवितो ध्यानी आणा।।१।।
शिर तत्पद, त्वं मानव शरीर। तत् पदावर अवलंबून।।२।।
असि ब्रह्मभूमी त्या वरी गणेश। दावितो विलास आपुला तो।।३।।
अकार उकार मकार अवयव। ओंकार प्रत्यय प्रत्यक्षचि।।४।।
बुद्धी अधिपती प्रेरक गणपती। बुद्धीवीण जगती जीणे व्यर्थ।।५।।
परा बुद्धीश आत्मभांडार। त्वं ब्रह्म सार उपदेशी।।६।।
दत्ता भागीरथी वरेण्य गणेश। संवाद गणेशगीतेमाजी।।७।।

# शब्द तेच छेडिता...✍

**- मुग्धा**

मैं रंग शरबतोंका, तू मीठे घाट का पानी
मुझे खुदमें घोल दे तो
मेरे यार बात बन जानी...

एखाद्या वस्तुचा रंग त्यातून बाहेर काढता येतो का? नाही. तो इतका काही पक्का असतो की त्याला वेगळे करायला गेलो तर वस्तूच नाश पावते कधी कधी! अगदी तसेच या नामरूपात्मक मायेचे असते. तिला वेगळे करताच येत नाही असे वाटते. पण महाराज मात्र आपल्या शब्द बाणाने तिला वेगळी करून दाखवतात. तिचे मिथ्यापण दाखवून देतात. ती फलकटच आहे हे दाखवतात.

पण नामरूपाला वेगळे काढल्यावर काय करायचे? महाराजांच्या श्रवणाचे पाणी हे गोड घाटातून म्हणजे 'मी' च्या घाटातून आलेले असते. त्याला घाटच म्हणावे लागेल. कारण अनेक मायेच्या वळणांनी त्याला वेढले आहे. हे पाणी कोणत्याही रंगात सहज मिसळते, कोणत्याही नामरूपात मिसळते. म्हणजेच बाह्यवेष कसाही असला तरी त्याला महाराज मिळवून घेतात. या गोड घाटातील पाणीही गोडच असते. नामरूपात्मक माया ही वेगवेगळे रंग दाखवित असते. पण महाराज या रंगाना सामावून घेतात व गोड सरबत बनवतात. माणसाला रंगाचे आकर्षण असते. रंगीत वस्तू आवडत असतात. तेव्हा ह्या रंगात महाराज बदल करीत नाहीत, कारण ते पाण्यासारखे असतात. पण त्या रंगाची चव बदलण्याची किमया मात्र त्यांचीच! वरवर जरी पूर्वीसारखा रंग दिसला तरी चव मात्र बदललेली असते. म्हणजेच गुरुदेवांनी आपलेसे केले की ती व्यक्ती बाहेरून जरी तशीच दिसली तरी त्या व्यक्तीचे वागणे इतरांना गोडच वाटते. खरं तर नुसत्या रंगाला चव नसते, तो कडूच असतो मूळात! आपलेही तसेच असते आपणही त्या रंगासारखे कडू असतो मूळचे! पण त्याला महाराज गोड करून सोडतात. सरबताच्या रंगासारखं आपल्याला गुरुभक्तीत एकरूप व्हायचं आहे, निजरंगात खेळायचं आहे, गुरूप्रेमात विरघळून जायचं आहे.



# षट्तिला एकादशी...✍

**- मुक्ता**

नुकतीच मकर संक्रात झाली. तिळगुळाचे महत्त्व तर प्रत्येक जण जाणतोच. व्यवहारातही आपण 'तीळ तीळ तुटणे', 'एक तीळ सात जणांनी वाटून खाणे' असे वाक्प्रचार ऐकतो. परंतु षट्तिला एकादशीला या तीळाचे महत्त्व आहे तरी काय? या तीळाने का एकदशा येणार आहे? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. पण या सगळ्यांची उत्तरे षट्तिला एकादशीला महाराजांच्या निरूपणात मिळाली.

स्थूल देह हा पंचभूतांचा! निसर्गाचे चक्रच असे आहे की स्थूळ देह हा दिवसागणिक झिजत जातो. आपल्या नकळत! तीळा-तीळाने जरी झिजला, नासला तरी ती क्रिया चालूच असते. म्हणूनच विवेकाच्या सहाय्याने याचा शेवट आपल्याला पहाता येतो. दहा वर्षांपूर्वीचे आपण नी आताचे यात कितीतरी फरक झालेला असतो. जुने व नवे फोटो पाहिले की हे जाणवते. जरी हा तीळातीळाने झिजत असला तरी आपण मात्र मणामणाने टाकायचा! म्हणजेच एका गुरुशब्दात त्याचे तुकडे तुकडे करून टाकायला शिकायचे. घाबरू नका! खरेच तुकडे नाही हो करायचे, फक्त जाणायचे की हा नाशिवंत आहे व आपला नाही. पुढे गेल्यावर सूक्ष्म देह तर उरतोच! अहो, तो तर खरा लढवैय्या, आपल्याला अडकवून ठेवणारा! दारात रखवालदार उभा असतो ना अगदी तस्सा! आणि तोही षड्रिपुंनी नटलेला! आता याला कसे हटवायचे? अहो गुरुदेवांचीच सहा शस्त्रे शम, दम, उपरम, तितिक्षा, श्रद्धा, समाधान ही अंगी बाणवायची! जोडीला विवेक, वैराग्य व मुमुक्षुत्व ह्यांचीही साथ घ्यायची! मगच त्याचा फडशा पडतो. पण पुढे कारण नामक राक्षस उभाच! याच्याही अंगी नाना कळा असतात. पण त्याची कळ महाराजांना ठाऊक असते. तिथेही आपले संक्रमण महाराज करीत असतात. कारणदेहाचा पालट महाकारणातच करून सोडतात. इथे मात्र आपली गती तीळातीळाने होत आहे असेच आपल्याला वाटते. पण तसे नसते. झाडाची कळी केव्हा उमलते ते कळतच नाही. तसेच आपल्या नकळत हे सर्व घडत

पान नं. १९ वर

# बहुमूल्य भेट...✍

**- हिमगौरी जोशी**

गुरुदेवांमुळे आपले आयुष्य बदलत असते. त्यांनी दिलेला चष्मा लावल्यामुळे सारे काही निराळे दिसत असते आणि आपल्या व इतरांच्या कृतीतून काही तरी नवीन शिकण्याची मोहीम सुरु होते. आपली नित्यनियमाने करण्याची कामे तीच असतात, परंतु त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो.

गौरीला लहानपणापासूनच 'कार्टून' पाहण्याची फार आवड! पण गुरुदेवांमुळे तेच कार्टून वेगळ्या 'अँगल' ने पाहावे असे वाटले. एक ॲनिमेटेड चित्रपट 'पोलार एक्सप्रेस' हा गौरीने पाहिला. त्यात एका मुलाची गोष्ट दाखविली आहे. त्याचा सँटाक्लॉज वर विश्वास नसतो आणि ख्रिस्मसच्या रात्री त्याच्या दारासमोर सँटाक्लॉजपर्यंत पोहचविणारी ट्रेन येऊन थांबते. त्यात तो चढतो व प्रवासास निघतो. त्याच्यासोबत इतरही मुले असतात. कित्येक वेळा तो ट्रेनमधून उतरेल की काय असे वाटते. परंतु एक व्यक्ती नेहमी त्याच्यासोबत असते. ती त्याला उतरू नाही देत शेवटपर्यंत! त्याला सँटाक्लॉज अस्तित्वात नाही असे वाटत असते. मुक्कामी पोहचल्यानंतर त्याला सँटाक्लॉज दिसतो व त्याला 'जिंगल बेल' हे गिफ्ट मिळते. जिंगलबेलची खासियत ही की ज्याला सँटाक्लॉजवर विश्वास असतो. त्यालाच त्याचा आवाज ऐकू येतो आणि जाताना त्याच्या तिकिटावर **श्रद्धा म्हणून** पंच करून देतात.

आपले ही तसेच असते. आपलाही गुरुदेवांवर विश्वास नसतो. तरीसुद्धा आपल्याला ते ब्रह्मपूरीच्या प्रवासास नेतात. त्या ट्रेनमधून उतरू नये याची दखल घेतात. आपली स्वरूपास भेट होताच आपल्याला त्यांची 'आठवण' ही बहुमूल्य भेट देतात, हो, पण आपल्याला त्यांच्यावर श्रद्धा असेल तरच ती जिंगल बेल आपल्या हृदयात वाजते व महाराजांचा आवाज ऐकू येतो. प्रापंचिकाने प्रपंच न करून कसे चालेल, म्हणून पुन्हा प्रपंचात आणून सोडतात आणि सोडण्यापूर्वी प्रत्येकाच्या तिकिटावर पंच केल्याप्रमाणे प्रत्येकाला काही तरी संदेश देतात.

खरेच किती शिकण्यासारखे असते. पण हे सगळे त्यांच्यामुळेच शक्य असते. त्यांच्यामुळेच जगण्याची खरी मजा येत असते. त्यांना धन्यवाद म्हणणेही कमीच आहे. बरे कोणती भेट दिली तरीही ती नश्वरच! त्यांची आठवण कायम स्वरूपी आमच्या हृदयात असावी तरच जीवनाचे सार्थक होईल.

---

पान नं. १७ वरून

असते. महाराजांचे बोट धरल्यावर! परंतु इथे अंहकाराचे वारे लागायची शक्यता असते. पण महाराज मात्र या अंहाकररूपी प्राण्याला रोपट्याच्या आजुबाजुला जाऊच देत नाहीत. नाहीतर तो रोपटेच उपटून टाकेल ना!

मग मात्र आत शिरल्यावर सापडते ती गोडीच! गुळासारखी घन घन गोडी! सर्व तीळांना एकत्र बांधणारी व गोड करणारी गोडी! अनेक तीळ दिसले तरी लाडू मात्र एकच, गोडीने बांधलेला, एकदशा असलेला!

**अकार, उकार, मकार करीती हा विचार। विठ्ठल आहे अपरंपार।।**

---

## उत्सव विशेष...

**श्रीसस दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**

**पौष कृ. १ दि. ९ जाने., ते १८ जाने., २०१४**

**मूळपद**

गुरुमूर्ती चैतन्य देखियली। वरी वरी दिसे देहधारी।।
सूक्ष्म दृष्टी दिसे निराकारी। जाणते समजती अंतरी।।१।।
निराकाराला सोडूनी आकार। राहील काय सांगा क्षणभर।
पहा पहा करूनी विचार। सर्वचि आहे चिदाकार।।२।।
विकाराचे सोंग वरीवरी। दिसते अंतरी बाहेरी।
नव्हे त्याचा स्पर्श निराकारी। जैसेचि तैसे निरंतरी।।३।।
निर्गुण असूनी सगुण। ब्रह्म विलसे परिपूर्ण।
चित्र शर्करा संपूर्ण। तेवी समजा हे खूण।।४।।
भागिरथी सद्‌गुरु माऊली। जीवोद्धारार्थ उदेली।
दत्ता अवचित गाउली। प्रबोधाचेनी अनुभविली।।५।।

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३ दि. २४ फेब्रु. ते २७ फेब्रु.२०१४

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५
दि. १३ मार्च ते २२ मार्च २०१४

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १३ दि. ९ मे ते १५ मे २०१४

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५ दि. ४ जुलै ते १३ जुलै २०१४

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४
दि. २ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट २०१४

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. ३० ऑक्टो. ते ८ नोव्हें २०१४

To,

BOOK-POST

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्रीहनुमान जयंती** | - चैत्र पौर्णिमा |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व. १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ. १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व.१ ते ९ |

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, जी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

'पाझर'चे दहावे वर्ष सरत आले असून पुढील अंकाने अकराव्या वर्षात पदार्पण होत आहे. 'पाझर'च्या वाचकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न करीत आहोत ज्यायोगे वाचकांच्या प्रतिक्रिया अजमावून अंकाची सुधारणा करण्यात येईल. कृपया सर्व वाचकांनी खालील माहिती भरून हा तपशील मंदिराच्या पत्त्यावर पाठवावा. आपल्या प्रतिक्रिया हेच आमचे मानधन!

---

वाचकाचे संपूर्ण नाव : ______________________

पत्ता : ______________________

______________________

______________________

(कृपया एकाच पत्त्याचा तपशील द्यावा.)

नित्यसाधनेसाठी आपण कोणत्या केंद्राशी जोडलेले आहात? (उदा. सद्गुरु आश्रम-नरसिंगड, बलभीम मंदिर-साडेगाव, भागीरथी गुरुमंदिर ट्रस्ट-अमरावती, बलभीम भवन-इंदौर, घोलप आजींचे घर - नागपूर...... अशा प्रकारे केंद्राचे नाव लिहावे.)

______________________

कोणकोणत्या उत्सवात सहभाग असतो?

______________________

आपल्याला अनुग्रह दिलेल्या सद्गुरुंचे नाव :

______________________

द्वैमासिक नियमित मिळते का? हो / नाही

नियमित वाचन होते का? हो / नाही

आपण 'पाझर'चे वाचन वेबसाईटवरून करता का? हो / नाही

गेल्या दहा वर्षातील आवडलेली सदरे : ______________________

______________________

______________________

चालू सदरांमधील आवडती सदरे : ______________________

______________________

______________________

काही सूचना / अपेक्षित बदल : ______________________

______________________

______________________

आपली प्रतिक्रिया : ______________________

______________________

______________________

जागा अपुरी पडल्यास प्रतिक्रिया स्वतंत्र कागदावर लिहून फॉर्मसोबत पाठवावी. (वेबसाईटवरून वाचन करणाऱ्या वाचकांनी त्यांच्या प्रतिक्रिया ऑनलाईन कळवाव्या.)

**वरील फॉर्म भरून पाठविणाऱ्या वाचकासच पुढील वर्षी 'पाझर' पाठविला जाईल. ज्यांचे फॉर्म आमच्यापर्यंत पोहोचणार नाहीत त्यांना 'पाझर' पाठविला जाणार नाही याची कृपया दखल घ्यावी.**